महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

**शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि १**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.

दिनांक :-१५ जून, २०१३

**वाचा :-**

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १ दिनांक ०४ जानेवारी, २०१३

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६ दिनांक १९ जानेवारी, २०१३

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३

४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३

५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५७, ५८ व ५९ दिनांक २० एप्रिल, २०१३

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र २००९ / (६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२

---

प्रस्तावना -

राज्यातील सर्व शाळांना **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व नवीन

खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देताना **हेतुपत्र** (Letter of Intent) **व शाळा मान्यता प्रमाणपत्र** (Letter Of Approval) ची पध्दती स्वीकारावी असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने CBSE, ICSE इत्यादी बोर्डांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

२. कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे यासाठी शासनाने सन २०१३ मध्ये **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** पारित केला असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त ७,१०८ अर्जाची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ अर्जांना पात्र करण्यात आलेले आहे. या पात्र प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

## शासन निर्णय -

(१) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ७१०८ प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे २४१७ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण प्राप्त प्रस्ताव | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | ६,१२१ | १,९७७ | ४,१४४ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ९८७ | ४४० | ५४७ |
| एकूण | | ७,१०८ | २,४१७ | ४,६९१ |

(२) **शाळा दर्जावाढीच्या** ४४० पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबतची **परवानगी** देण्यात येत आहे.

(३) **नवीन शाळांचे प्रस्ताव** - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या १९७७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उपरोक्त संबधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापनांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित सक्षम अधिका-यांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता १ली पासून परवानगी देण्यात येईल.

(५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

(६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम**, २००९ मधील त्याचप्रमाणे **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिरित्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

(८) सोबतच्या विवरपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबातची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन / दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश ठुबे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
विभागांतर्गत सर्व संचालक.
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषदा.
सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.
मा. मंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा.अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
निवडनस्ती माशि - १.

शासन निर्णय क्र.-स्वयंअ २०१३/(८५/१३)/मशि-१ चे सहपत्र

| अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा / दर्जा वाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| ७११ | पुणे | मिरा एज्युकेशन ट्रस्ट, अंधेरी वेस्ट, मुंबई-५३ | ट्री हाऊस हायस्कूल, १२ दुधानेनगर, कर्वेनगर, पुणे-५२ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७१२ | पुणे | के. इश्वरदास बेहल चॅरिटेबल ट्रस्ट, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे | बेकॉन हायस्कूल, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७१३ | पुणे | अप्पा भानसे शिक्षण संस्था, तळवडे, पुणे | न्यू एंजल्स इंग्लिश स्कूल, तळवडे, ता.हवेली | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७[illegible] | पुणे | श्री दत्तकृपा शैक्ष. व कृषी ग्राम विकास प्रतिष्ठाण घारगाव ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर | श्री. आनंदराव जगताप इंग्लिश मेडियम स्कुल, मांडवगण फराटा ता. शिरुर जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७१५ | पुणे | स्वामी विवेकानंद ग्रामविकास प्रतिष्ठान ता. शिरुर जि.पुणे. | स्वामी विवेकानंद इंग्लिश मेडियम स्कुल मांडवगण फराटा ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७१६ | पुणे | रावसाहेब दादा पवार घोडगंगा सह.साखर का.मर्या.न्हावरा ता. शिरुर जि.पुणे. | रावसाहेब दादा पवार इंग्लिश मेडियम प्रायमरी स्कुल न्हावरे ता. शिरुर जि.पुणे. (सी.बी.एस.ई.) | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७१७ | पुणे | राजे प्रतिष्ठान सुपे ता. बारमती जि.पुणे. | न्यु इंग्लिश स्कुल चांदगुडेवाडी सुपे ता. बारामती जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७१८ | पुणे | एम.सी.ई. सोसायटी, आझम कॅम्पस, पुणे | हाजी अब्दुल कादर मेमन इंग्लिश मिडीयम स्कूल, संतोषनगर, कात्रज,पुणे-४६ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७१९ | पुणे | सूर्यदत्ता एज्यूकेशन फाऊंडेशन, विजयानगर कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे | सूर्यदत्ता नॅशनल स्कूल, पाटील नगर, बावधन, खुर्द, | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२० | पुणे | भामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ, भांबोली ता. खेड जि.पुणे. | भामचंद्र इंग्लिश मेडियम ता. खेड जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२१ | पुणे | दिव्यज्योती एज्युकेशन सोसायटी देवाची ऊरुळी ता. हवेली जिपुणे. | के बाजारे इंग्लिश मेडियम स्कुल, देवाची ऊरुळी ता. हवेली जिपुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२२ | पुणे | वेदविज्ञान महाविद्यापिठ बेंगलूर | श्री श्री ज्ञानमंदिर देवाची जाळी ता. जुन्नर जि.पुणे. | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२३ | पुणे | पी.ए.इनामदार एज्युकेशन ट्रस्ट पुणे | लेडी ताहेरुन्निसा इनामदार इंग्लिश मेडियम स्कुल, वडगाव शेरी ता. हवेली जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२४ | पुणे | वेदविज्ञान महाविद्यापिठ बेंगलूर | श्री श्री ज्ञानमंदिर चिंबळी ता. खेड जि.पुणे. | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |



**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

---

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
**शासन निर्णय क्र.एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम- २**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.
**दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०१४**

**वाचा :-** १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ / (६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे पत्र क्र.अमाशा/स्वयंअर्थ/२०१३/६०४५४/१५-क(५)/१२०१९, दिनांक २४ डिसेंबर २०१३.

**प्रस्तावना -**

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ०८ ऑगस्ट,२०१३ पर्यत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

**ब)** ज्या व्यवस्थापनास सन २०१४-१५ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहिल. अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

**क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी (Permission)** दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

३.३ सोबतच्या **विवरणपत्रातील** यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधिल सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

३.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागांतर्गत सर्व संचालक.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.
संबंधित प्रशासन अधिकारी, महानगर पालिका/नगर परिषद/नगर पालिका

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा. मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
निवडनस्ती (एसएम २).

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १३११ | पुणे | केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजीक संस्था वडगंाव बूा | ज्ञानसाधना विद्या मंदिर वडगांव बूा | नवीन शाळा | माध्यमिक | मराठी | पात्र |
| १३१२ | पुणे | केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजीक संस्था वडगंाव बूा | ज्ञानसाधना विद्या मंदिर वडगांव बूा | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३१३ | पुणे | श्री लक्ष्मीनारायण ट्रस्ट रुपीनगर पिंपरी कॉलनी पिंपरी | भगवती इंग्लिश मं०ेडी. स्कूल रुपीनगर तळवडे | नवीन शाळा | माध्यमिक | मराठी | पात्र |
| १३१४ | पुणे | विद्या निकेतन ग्लोबल इंन्टयुटयूट बोटा ता.संगमनेर | विद्या निकेतन पी.एम.हायस्कूल साकोरी ता.जुन्नर | नवीन शाळा | माध्यमिक | मराठी | पात्र |
| १३१५ | पुणे | सुभाष अण्णा कूल शिक्षण प्रसाकर राहू ता.दौंड | अलेयन्स इंग्लिश मेडी स्कूल केडगांव ता.दौंड | नवीन शाळा | माध्यमिक C B S E | इंग्रजी | पात्र |
| १३१६ | पुणे | संजिवणी सोशल फौन्डेशन इंदापूर जि.पुणे | डॉ कदम गुरुकुल माध्य.विद्या.इंदापूर | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३१७ | पुणे | विकास प्रतिष्ठाण चंदननगर पुणे | पार्वती चॅम्पीयण कॉनव्हेन्ट स्कूल करंदी ता.शिरुर | नवीन शाळा | माध्यमिक I C S E | इंग्रजी | पात्र |
| १३१८ | पुणे | श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड ता.पुरंदर | जिजामाता इंग्लिश मेडी स्कूल जेजूरी ता.पुरंदर | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३१९ | पुणे | समाज शिक्षण मंडळ विंझर ता.वेल्हा | अमृतेश्वर इंग्लिश मेडी स्कूल विंझर ता.वेल्हा | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३२० | पुणे | चाकण शिक्षण मंडळ चाकण ता.खेड | नवोन्मेश विद्यालय चाकण ता.खेड | नवीन शाळा | माध्यमिक | मराठी | पात्र |
| १३२१ | पुणे | चाकण शिक्षण मंडळ चाकण ता.खेड | नवोन्मेश विद्यालय चाकण ता.खेड | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३२२ | पुणे | धायरेश्वर विद्या व क्रिडा प्रतिष्ठाण धायरी पुणे | नालंदा माध्यमिक माध्य. विद्यालय,धायरी | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३२३ | पुणे | विद्या प्रसारणी सभा शिवाजीनगर पुणे | व्ही पी एस हायस्कूल वाकसई ता.मावळ | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३२४ | पुणे | अनिशा एज्यूकेशन ट्रस्ट कोरेगांव पार्क पुणे | अनिशा ग्लोबल स्कूल मारुंजी (जांबे) ता.मुळशी | नवीन शाळा | माध्यमिक (CBSE) | इंग्रजी | पात्र |
| १३२५ | पुणे | सुर्यदत्ता एज्युकेशन फौन्डेशन बावधन बू ाा ता.मुळशी | सुर्यदत्ता नॅशनल स्कूल बावधान | नवीन शाळा | माध्यमिक CBSE | इंग्रजी | पात्र |
| १३२६ | पुणे | क्रिएटीव्ह एज्युकेशन सोसा. चिंचवड पुणे | क्रिएटिव्ह पब्लीक स्कूल,रेल्वेस्टेशन आकूर्डी पुणे | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३२७ | पुणे | विद्याधन एज्युकशन सोसा. पिंपळे गुरव पुणे | जिज्ञासा नॅशनल स्कूल केजळ ता. भोर | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३२८ | पुणे | विद्या निकेतन ग्लोबल इंन्टयुटयूट बोटा ता.संगमनेर | विद्या निकेतन इंन्टरनॅशनल ॲकॅडमी धानोरी (आळंदी) ता.,खेड | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३२९ | पुणे | श्री सिध्देश्वर प्रतिष्ठाण को-हाळे ता.बारामती | श्री सिध्देश्वर पब्लिक स्कूल को-हाळे बू ाा ता.बारामती | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३३० | पुणे | श्री शिवाजी मराठा सोसायटी शुक्रवार पेठ पुणे | समाजसेवक शिवाजीराव जेधे इंग्लिश मेडी.स्कूल बोरी पारधी ता.दौंड | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३३१ | पुणे | गीता शिक्षण प्रसाकर मंडळ पळसदेव ता.इंदापूर | एल.जी. बनसोडे विद्या पळसदेव ता.इंदापूर | नवीन शाळा | माध्यमिक | मराठी | पात्र |
| १३३२ | पुणे | गीता शिक्षण प्रसाकर मंडळ पळसदेव ता.इंदापूर | एल.जी. बनसोडे विद्या पळसदेव ता.इंदापूर | नवीन शाळा | माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| १३३३ | पुणे | रयत शिक्षण संस्था सातारा | महात्मा गंा०धी विद्यालय, मंचर ता.आंबेगांव | नवीन शाळा | माध्यमिक | मराठी | पात्र |

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १०४२ | पुणे | दत्तकला शिक्षण संस्था, स्वामी चिंचोली, ता.दौंड, जि.पुणे | दत्तकला इंटरनॅशनल स्कूल, गट नं.541/2, स्वामी चिंचोली, ता.दौंड, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | मराठी | पात्र |
| १०४३ | पुणे | माऊंट झायन एज्युकेशनल फौंडेशन्स, महंमदवाडी, हडपसर, पुणे | अबंडंट लाईफ स्कूल, स.नं.40/2, कृष्णानगर, महंमदवाडी, हडपसर, पुणे | दर्जावाढ | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| १०४४ | पुणे | भिमाशंकर शिक्षण संस्था, ता. आंबेगाव जि.पुणे. | दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील, दत्तात्रनगर, पारगाव, आवसरी बु. ता. आंबेगाव जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| १०४५ | पुणे | न्यू एज्युकेशन सोसायटी, सोमवार पेठ, पुणे-11 | न्यू एज्युकेशन सोसायटीची इंग्लिश मिडीयम प्रायमरी स्कुल, सोमवार पेठ,पुणे-11 | दर्जावाढ | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| १०४६ | पुणे | अनिशा एज्युकेशन ट्रस्ट, कोरेगांव पार्क, पुणे | अनिशा ग्लोबल स्कूल, स.न.110/1अे मारुंजी, हिंजेवाडी-मारुंजी-कासारसाई रोड, ता.मुळशी, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक (CBSE) | इंग्रजी | पात्र |
| १०४७ | पुणे | चाकण शिक्षण मंडळ,चाकण, ता.खेड, जि.पुणे | नवोन्मेष इंग्लिश मिडीयम स्कूल, चाकण, ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| १०४८ | पुणे | सुर्यदत्ता एज्युकेशन फाऊंडेशन, सदाशिव पेठ, पुणे | सूर्यदत्ता नॅशनल स्कूल, बावधन बु. पाटीलनगर, पुणे-21 | दर्जावाढ | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| १०४९ | पुणे | संत ज्ञानेश्वर विद्या प्रतिष्ठान, खरपुडी बु., ता.खेड, जि.पुणे | चौधरी पाटील इंग्लिश मिडीयम स्कूल, खरपुडी बु., ता.खेड, जि.पुणे | दर्जावाढ | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| १०५० | पुणे | श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ, मोई, कुरुळी, ता.खेड, जि.पुणे | श्री समर्थ इंग्लिश मिडीयम स्कूल, चिंबळी फाटा, चिंबळी, ता.खेड,जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| १०५१ | पुणे | अॅग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती, जि.पुणे | शारदाबाई पवार विद्यामंदीर, शारदानगर, मु.पो.माळेगांव कॉलनी, मु.पो.माळेगांव बु., ता.बारामती, जि.पुणे | दर्जावाढ | उच्च प्राथमिक | मराठी | पात्र |
| १०५२ | पुणे | उमाबेल एज्युकशनल फाऊंडेशन, औंध, पुणे | बॉब-प्रायमन इंटरनॅशनल स्कूल, गट नं.97/7, घर नं.765/1, चांदखेड, ता.मावळ, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| १०५३ | पुणे | विद्याधन एज्युकेशन सोसायटी, नेताजी नगर, पिंपळे गुरव, पुणे | जिज्ञासा नॅशनल स्कूल, 797, मु.पो. कैजळ, ता.भोर, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| १०५४ | पुणे | श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण, मांडवगण फराटा, ता.शिरुर, जि.पुणे | नामदार श्री शरदचंद्र पवार प्राथमिक विद्यालय, मांडवगण फराटा, ता.शिरुर, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| १०५५ | पुणे | श्री पांडूरंग ग्रमिण विकास प्रतिष्ठाण, निमगांवसाया, जुन्नर, पुणे | नंदीग्राम इंटरनॅशनल स्कूल, निमगांवसाया, ता.जुन्नर, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| १०५६ | अहमदनगर | स्वामी विवेकानंद ग्रामविकास प्रतिष्ठाण वसू जळगाव ता.पाथर्डी जि.अहमदनगर | स्वामी विवेकानंद विद्यालय वसू जळगाव ता.पाथर्डी | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | मराठी | पात्र |
| १०५७ | अहमदनगर | आप्पासाहेब धनवटे मेमोरियल ट्रस्ट पुणतांबा ता.राहाता जि.अहमदनगर | लिटल एन्जल्स सेकंडरी स्कूल पुणतांबा ता.राहाता | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |